# नियमीत दिवाणी दावा क्र.३९४/२०१४ मधील
# निशाणी क्र.९० वर आदेश

**CNRNO.MHLA110004922014.**

१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज वादीने अर्जात नमूद साक्षीदाराला साक्षी समन्स काढण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जास प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन अर्जात नमूद कारण योग्य व कायदेशीर नसल्यामुळे अर्जात नमूद साक्षीदाराला साक्षी समन्स काढण्याची आवश्यकता नसल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रकरणातील दाव्यामधील व कैफीयतीमधील कथनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादींनी मिळकतीची मालकी जाहीर करुन मिळण्याकरिता व निरंतर मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणामध्ये नि.क्र.२२ ला मुद्दे काढण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, वादींना केसप्रमाणे पुरावा दाखल करण्यास संधी देणे न्यायोचित होणार आहे. तसेच वादींना अर्जात नमूद साक्षीदाराची साक्ष नोंदविण्याकरिता संधी दिल्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जात नमूद साक्षीदार साक्षीसाठी हजर झाल्यानंतर प्रतिवादींना साक्षीदाराची उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.९० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींकडुन नियमाप्रमाणे साक्षीभत्ता स्वीकारुन नि.क्र.९० वरील अर्जात नमूद साक्षीदाराला अर्जात मागणी केल्याप्रमाणे साक्षी समन्स काढावेत.

सही/-

दि. ११.०८.२०२१.

(के. एस. सुर्यवंशी)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.